आवक क्र. : ६६५
दिनांक : १३/९/२२
का.अ./…/बीडीडी/मुं. मं./म्हाडा

म. गृ. नि. व क्षे. प्राधिकरण
आवक क्र. 8218
दिनांक 2 SEP 2022
अधिकाऱ्याची सही

बी.डी.डी. चाळींमधील पोलीस कर्मचारी/त्यांचे वारसदार यांच्याकडून पुनर्विकसित गाळ्याकरीता आकारावयाच्या बांधकाम खर्चाबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्र:- बैठक-२०२१/प्र.क्र.१४८/गृनिप
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ३० ऑगस्ट, २०२२.

आवक क्र. : 8218
दिनांक : 6/09/2022
उपमुख्य.अ. / बीडीडी/मुं.

वाचा :-
1) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक : विविचा-२००७/प्र.क्र. ५१(भाग-१)/गृनिप, दि.३०.३.२०१६
2) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक: बैठक- २०२१/प्र.क्र.१४८/गृनिप, दि.९.७.२०२१
3) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र: विविचा-२०२१/प्र.क्र.१४८/गृनिप, दि.१८.८.२०२१
4) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.उपा.प्रा./उमुअ/बीडीडी/मुंमं/११९/२०२२, दि.२७.६.२०२२

प्रस्तावना :-

तत्कालीन मुंबई विकास विभागाने सन १९२१-१९२५ च्या दरम्यान मुंबईतील वरळी, नायगांव, व ना. म. जोशी मार्ग येथे बांधलेल्या चाळीमध्ये पोलीस विभागामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून दिलेली सेवानिवासस्थाने रिकामी करून देण्याबाबत व सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी तसेच दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना सदरहू पुनर्विकास प्रकल्पांतर्गत कायम स्वरूपी निवासस्थाने कशाप्रकारे उपलब्ध करून देता येतील, यावर उपाययोजना सुचविण्यासाठी तसेच, तद्नुषंगीक मुद्यांबाबत सखोल अभ्यास करून सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी दि.९.७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मा. मंत्री (गृहनिर्माण) व मा. मंत्री (गृह) यांच्या सहअध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने त्यांचा अहवाल दि.२०.७.२०२१ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दि.२२.७.२०२१ रोजी च्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित केलेल्या दि.१८.८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार, बी. डी. डी.चाळींमध्ये दि.१.१.२०११ पर्यंत जे पोलीस कर्मचारी वास्तव्यास आहेत (सेवेत कार्यरत, सेवानिवृत्त व दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांचे कायदेशीर वारस) त्यांना बी. डी. डी. चाळींच्या पुनर्विकासातंर्गत ५०० चौ. फूट क्षेत्रफळाचा पुनर्विकसीत गाळ्याचे वितरण मालकी तत्त्वावर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यानच्या काळात सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनातील विधानसभेमधील अंतिम आठवडा प्रस्तावावर दि.२५.८.२०२२ रोजी निवेदन करताना मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदरहू घरांची

किंमत घोषित केली. सदरहू पोलीसांकडून/त्यांच्या वारसांकडून पुनर्विकसीत गाळ्याच्या बांधकाम खर्चाची रक्कम (Construction Cost) किती आकारावी, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

बी. डी. डी. चाळींमध्ये पोलीस विभागामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन दिलेल्या सेवानिवासस्थानामध्ये दि.१.१.२०११ पर्यंत जे पोलीस कर्मचारी वास्तव्यास आहेत. (सेवेत कार्यरत, सेवानिवृत्त व दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांचे कायदेशीर वारस) त्यांना बी. डी. डी. चाळींच्या पुनर्विकासांतर्गत ५०० चौ. फूट क्षेत्रफळाचा पुनर्विकसीत गाळ्याचे वितरण मालकी तत्त्वावर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. उक्त पोलीस कर्मचारी/त्यांचे वारसदार यांच्याकडून त्यांना देण्यात येणाऱ्या कायमस्वरुपी पुनर्विकसित गाळयाकरीता रु.१५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा लक्ष केवळ) इतकी बांधकाम खर्चाची रक्कम (Construction Cost) आकारण्यात यावी.

२. वरळी, नायगांव, व ना. म. जोशी मार्ग येथील पोलीस सेवानिवासस्थानाच्या बदल्यात कायमस्वरुपी देण्यात येणाऱ्या पुर्नविकसित सदनिकेसाठी आकारण्यात येणाऱ्या वरील बांधकाम खर्चामूळे म्हाडास होणारा तोटा पुर्नविकासानंतर प्राप्त होणाऱ्या शासनाच्या हिश्यामधील (शासन व म्हाडा ७०:३० टक्के) नफ्यातून वर्ग करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०८३०१६४५१२६५०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arvind Tulshiram Shete

(अरविंद शेटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
५) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
८) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, (म्हाडा). गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई

११) सर्व उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१३) संचालक, मुंबई विकास विभाग चाळी (बी.डी.डी.), सावली इमारत, वरळी, मुंबई
१४) सर्व उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, मुंबई शहर
१५) निवडनस्ती (गृनिप), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

******** **

NO/DyCE/BDD/MB/187
Date: — 19/09/2022

Forwarded to Executive Engineer, Worli / Naigam / N.M.Joshi Marg BDD/MB for information and Necessary Action.